केरोसिन वितरणाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील केरोसिन वाहतूक दर निश्चित करण्याबाबत.

**महराष्ट्र शासन**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक-रॉकेल-२०२६/प्र.क्र. ५५ /नापु-२७**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १ एप्रिल, २०२६

वाचा :

१. शासन निर्णय क्रमांक: अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक रॉकेल-२०१४/ प्र.क्र.१६१/नापु-२७, दिनांक ०१ एप्रिल, २०१७.
२. शासन निर्णय क्रमांक: अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक रॉकेल-१५११/ प्र.क्र.३०५/नापु-२७, दिनांक १० जुलै, २०१३.
३. शासन निर्णय क्रमांक: अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक रॉकेल- २०२६/ प्र.क्र.५२/नापु-२७, दिनांक २५ मार्च, २०२६

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात गेल्या काही वर्षांपासून पंतप्रधान उज्ज्वला योजना व इतर योजनांद्वारे एलपीजी गॅस कनेक्शन मोठ्या प्रमाणात वितरीत करण्यात आले आहेत. त्यानुसार, गॅस कनेक्शन असणाऱ्या कुटुंबांना केरोसिन वितरण न करण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.१६/२०१४ (कडूजी देवबा पंड वि. केंद्र शासन) मध्ये दि. ७.०१.२०१६ रोजी आदेश दिले होते. त्यामुळे राज्यभरात केरोसिनचे अत्यंत मर्यादित स्वरुपात वितरण करण्यात येत होते. परंतू, सद्यस्थितीत सदर केस बंद झाली आहे, असे सरकारी वकील यांनी शासनास कळविले आहे. सद्यस्थितीत भू-राजकीय परिस्थितीमुळे एलपीजीचा तुटवडा जाणवत असल्याने केंद्र शासनाने दिनांक १२/०३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्यास ३७४४ कि.ली. एवढे नियतन मंजूर केले आहे. त्यानुषंगाने एलपीजीला पर्यायी इंधन म्हणून तात्पुरत्या स्वरुपात केरासिन वितरण करण्याकरीता शासनाने आदेश पारित केले आहेत. सबब, जिल्ह्यातील केरोसिन वाहतूक दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

**अ) तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपुर्तीसाठी असाधारण भत्ता मंजूर करणे:-**

घाऊक केरोसिन परवानाधारकांना तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपुर्तीसाठी सध्याच्या एक्स डेपो दराच्या ०.२५ टक्के इतका असाधारण भत्ता मंजूर करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व जिल्हाधिकारी तसेच नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी घाऊक परवानाधारकांना सद्यस्थितीतील एक्स डेपो दराच्या ०.२५ टक्के इतका असाधारण भत्ता मंजूर करावा.

**आ) डिझेल व्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींचा खर्च मंजूर करणे:-**

घाऊक केरोसिन परवानाधारकांना डिझेल व्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींचा खर्च म्हणून १० जुलै २०१३ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आलेल्या केरोसिन वाहतुक दराच्या ४० % इतकी वाढ मंजूर करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व जिल्हाधिकारी तसेच नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी घाऊक केरोसिन परवानाधारकांना डिझेल व्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींचा खर्च म्हणून संदर्भाधीन दिनांक १० जुलै, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्यांच्या जिल्हयात सुधारित करण्यात आलेल्या केरोसिन वाहतुक दराच्या ४० % इतकी वाढ मंजूर करावी.

**ब) केरोसिन वाहतुकीसाठी येणाऱ्या केवळ डिझेलवरील खर्चात झालेली वाढ मंजूर करणे:-**

केवळ डिझेल दरवाढीमुळे वाहतुक खर्चात वाढ देताना डिझेल दरवाढीचा खर्च देण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय दिनांक २६ सप्टेंबर, २००१ अन्वये विहित केलेल्या सुत्रानुसारच (Escalation Formula)केरोसिन वाहतुकीसाठी दरवाढ खर्च देण्याचे शासनाने ठरविले आहे. सदर सुत्र (Escalation Formula ) पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) दिनांक ०१/०४/२०१२ रोजी डिझेलचे दर | रुपये प्रति लिटर |
| ब) दिनांक ०१/०४/२०२६ रोजी डिझेलचे दर | रुपये प्रति लिटर |
| क) दिनांक ०१/०४/२०२६ रोजी डिझेलच्या दरात झालेली निव्वळ वाढ (ब-अ) | रुपये प्रति लिटर |
| ड) सुस्थितीतील वाहनांची वाहतूक सरासरी | ३.५ कि.मी. प्रति लिटर |
| ई) सर्वसाधारण टँक लॉरीची क्षमता | १२ कि.ली. |
| फ) वाहतूक खर्चात दयावयाची वाढ ( पैसे प्रति कि.मी. प्रति कि.ली.) | (ब-अ) (पैशांमध्ये)<br>------------- = (पैसे प्रति कि.मी. प्रति कि.ली.)<br>(ड* इ) |

सर्व जिल्हाधिकारी तसेच नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी त्यांच्या जिल्हयातील दिनांक १/४/२०१२ व दिनांक १/४/२०२६ रोजीच्या डिझेल दराच्या माहितीच्या आधारे वरील विहित सुत्रानुसार दिनांक १ एप्रिल, २०२६ पासून सुधारित केरोसिन वाहतुक दराची परिगणना करावी.

**क) डिझेलवरील खर्चाच्या वाढीमुळे वाहतूक दरात वाढ करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत:-**

घाऊक केरोसिन परवानाधारकांना केरोसिनची वाहतूक करण्याकरीता डिझेल दरामध्ये वाढ/घट झाल्यानुसार द्यावयाच्या वाहतूक दरात विहित सूत्रानुसार वाढ करण्याबाबतचे अधिकार सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांना या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत. सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी दरबर्षी दिनांक ०१ एप्रिल रोजी असलेले डिझेलचे दर विचारात घेऊन त्याचदिवशी दिनांक २६ सप्टेंबर, २००१ चे विहित सुत्र वापरुन डिझेलच्या दरातील वाढीवर आधारित केरोसिन वाहतूक दर निश्चित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

**२.** सर्व जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत प्रचलित एक्स-डेपो दर, एक्स डेपो दरावर जी. एस. टी. घाऊक वितरकांचे कमिशन, प्रचलित वाहतूक दर, तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपुर्तीसाठी असाधारण भत्ता, डिझेल व्यतिरिक्त इतर अनुषंगिक बाबींचा खर्च, किरकोळ वितरकांचे सुधारित कमिशन प्रकरणपरत्वे जी.एस.टी. व इतर अनुषंगिक बाबी विचारात घेऊन जिल्हयातील तसेच मुंबई शिधावाटप क्षेत्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत केरोसिनचे सुधारित दर निश्चित करुन तातडीने अधिसूचना निर्गमित करावी व त्याची प्रत शासनास पाठवावी.

**३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०११६३८३९१४०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
Date: 2026.04.01 16:39:21 +05'30'

**(अशोक आत्राम)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. सर्व विभागीय आयुक्त
२. नियंत्रक रेशनिंग व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व उपायुक्त (पुरवठा)
५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
६. अन्न वितरण अधिकारी (पुणे / सोलापूर / नागपूर)
७. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
८. मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
९. निवडनस्ती नापु-२७.